जहुर शेख वि.

अब्दुल शेख व.११

## निशाणी क्रमांक ४७ वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला ''विना म्हणणे व विना कैफियत '' हा आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांच्या मते, सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र.१ यांनी मुदतीत त्यांची कैफियत दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द 'विना म्हणणे व विना कैफियत' आदेश दि.२५.०९.२०२५ रोजी पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ हे मध्यंतरीच्या कालावधीमध्ये आजारी असल्याने त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी जाणुनबुजून कैफियत देण्यास विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांना कैफियत देण्याची संधी न मिळाल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे ' विना म्हणणे व विना कैफियत' आदेश रद्द करुन कैफियत दाखल करुन घेणेची विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केलेली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र.४९ वर म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांचे अर्जास खर्च आकारुन योग्य ते आदेश करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द हक्कस्थापनेसाठी, कायम ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द 'विना म्हणणे व विना कैफियत' असा आदेश पारीत झालेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान

होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादीचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रतिवादी यांचा नि.४७ वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये ३००/- (रु.दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- २४/०४/२०२६ ( एन.ए.बकरे )

ठिकाण- कुडाळ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

कुडाळ